**TATA POWER**

# दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड,

बॉंबे हाउस, २४, होमी मोदी स्ट्रीट, मुंबई- ४०० ००१, भारत, टेलिफोन: (९१ २२) ६६६५ ८२८२, फॅक्स: (९१ २२) ६६६५ ८८०१,
Website: www.tatapower.com, CIN: L28920MH1919PLC000567

**TATA**

## सार्वजनिक नोटिस

## अतिरिक्त अधिभाराच्या मान्यतेसाठीच्या टाटा पॉवर कंपनी लिमिटेड - वितरण व्यापार विभागाच्या याचिकेवरील हरकती व प्रतिक्रिया (वर्ष २०१७ - खटला क्रमांक ७९)

१. कलम १०२ (अडचणींचे निवारण करण्याचे अधिकार) अन्वये एमईआरसी (बहुवर्षीय शुल्क) नियमनाच्या २०१५ च्या अतिरिक्त अधिभाराच्या मान्यतेसाठी टाटा पॉवर कंपनी लिमिटेडच्या वितरण व्यापार (टाटा पॉवर-डी) विभागाने याचिका दाखल केली आहे.

२. समितीने १० नोव्हेंबर २०१७ रोजी याचिका स्विकारली असून कलम ६४ (२) या विद्युत पुरवठा कायदा, २००३ अन्वये सर्वसामान्य लोकांकडून सल्ले व हरकती मागवण्यासाठी सार्वजनिक अधिसूचना जारी करण्याचे आदेश टाटा पॉवर- डीला देण्यात आले आहेत.

३. आयोगाने आपल्या २१ ऑक्टोबर २०१६ रोजी, २०१६ चा खटला क्रमांक ४७च्या बहुवर्षीय आदेशामध्ये टाटा पॉवर-डी ने प्रस्तावित केलेले अतिरिक्त अधिभार अडकून राहिलेल्या खर्चासाठीच्या आवश्यक पात्रतेचे समाधान करत नाही असे सांगून निर्धारित केले नव्हते.

४. सदर याचिकेत टाटा पॉवर -डीने कथन केल्याप्रमाणे, बहुतांश एचटी ग्राहकांनी टाटा पॉवर -डीमधून ओपन ॲक्सेस (ओए) प्रकारात रुपांतरित होणे पसंत केले असल्याने टाटा पॉवर-डीच्या दीर्घकालीन क्षमतेवर त्याचा परिणाम झाला आहे. म्हणूनच, २००३ च्या विद्युत पुरवठा कायद्याच्या कलम ४२ (४) अन्वये अतिरिक्त अधिभार आकारण्यास मान्यता देण्यात यावी, यासाठी टाटा पॉवर -डीने याचिका दाखल केली आहे.

६. **अतिरिक्त अधिभार :**
खाली नमूद केल्याप्रमाणे टाटा पॉवर -डीने प्रत्येक युनिटवर **०.४४ रुपयांचा अतिरिक्त अधिभार** आकारण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

| विशेष माहिती | संदर्भ | युनिट्स | शुल्क |
|---|---|---|---|
| **पायरी १ : बंद केलेल्या व अडकलेल्या उर्जा निर्मिती क्षमतेमध्ये ओपन ॲक्सेसचा सहभाग ठरवणे** | | | |
| सरासरी ओपन ॲक्सेस आकारमान (नमूद केल्याप्रमाणे) (सप्टेंबर २०१६ ते मार्च २०१७) जानेवारी २०१७ वगळता | (अ) | एमयूज् | ३६९.८७ |
| सरासरी बंद केलेला भाग (ऑगस्ट २०१६ ते मार्च २०१७) (रेल्वेला केलेल्या विक्रीमुळे बंद झालेल्या भागासह) | (ब) | एमयूज् | ५५४.६५ |
| ओपन ॲक्सेस आणि बंद केलेल्या भागाचे गुणोत्तर | (क) = (अ)/(ब) | टक्के | ६६.६९ टक्के |
| **पायरी २ : अडकलेल्या क्षमतेचे शुल्क ठरवणे** | | | |
| टाटा पॉवर - जीच्या वर्ष २०१६-१७ साठीच्या औष्णिक वीज निर्मितीसाठीचे निश्चित शुल्क | (ड) | कोटी रुपये | ९१६.८४ |
| टाटा पॉवर - डी चा भाग | (इ) | कोटी रुपये | ४७८.३६ |
| वित्तवर्ष २०१६-१७ साठी औष्णिक वीज केंद्रांतून उपलब्ध झालेली एकूण उर्जा | (फ) | एमयूज् | ३१५०.१९ |
| औष्णिक वीज केंद्रांतील सरासरी प्रति युनिट निश्चित शुल्क | (ग) = (इ)/(फ)×१० | रुपये प्रति युनिट | १.५२ |
| एकूण प्रक्षेपित बंद केलेले किंवा राखीव बंद केलेले आकारमान - वर्ष सप्टेंबर २०१६ ते मार्च २०१७ (जानेवारी २०१७ वगळता) | (ह) | एमयूज् | १५९.१७ |
| बंद केलेले किंवा राखीव बंद केलेल्या क्षमतेसाठीचे निश्चित शुल्क | (ई) = (ग)/(ह)×१० | रुपये प्रति युनिट | २४.१७ |
| ओपन ॲक्सेसमुळे अडकलेल्या क्षमतेचा खर्च | (ज) = (ई) ×(क) | रुपये प्रति युनिट | १६.१२ |
| **पायरी ३ : कॅप्टीव्ह व नॉन-कॅप्टीव्ह ओएचा परिणाम वेगळा करणे** | | | |
| सप्टेंबर २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीतील ओपन ॲक्सेस आकारमान (जानेवारी २०१७ वगळता) | (के) | एमयूज् | ३६९.८७ |
| **पायरी ३ : अतिरिक्त अधिभारांचे निश्चितीकरण** | | | |
| प्रति युनिट अतिरिक्त अधिभार (नॉन-कॅप्टीव्ह ओएसाठी लागू) | (ई)= (ज)/(के)×१० | रुपये प्रति युनिट | ०.४४ |

६. टाटा पॉवर- डी च्या कार्यालयांमध्ये अर्ज केल्यानंतर खालील कागदपत्रांच्या प्रती मिळू शकतील :

अ. सीडी (इंग्रजी)सह विस्तृत याचिकेची कागदपत्रे ( द टाटा पॉवर कंपनी लिमिटेड या नावे ७५ रुपयांच्या डीडी किंवा धनादेश किंवा रोख रकमेसह)

ब. विस्तृत याचिका कागदपत्रे (इंग्रजी) (५० रुपयांच्या भरण्यासह)

क. विस्तृत याचिका कागदपत्रांची सीडी (इंग्रजी) ( २५ रुपयांच्या भरण्यासह)

**कार्यालये :**

| कार्यालये | पत्ता | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| नोंदणीकृत कार्यालय | श्री. राजेंद्र दोशी, द टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ | ६७१७ १०३२ |
| कारनाक | श्रीमती शेली त्रिवेदी, द टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, कॉर्पोरेट सेंटर बी, ३४ संत तुकाराम मार्ग, कारनाक बंदर, मुंबई - ४००००९ | ६७१७ १४४८ |
| धारावी | श्री. तेजिंदरसिंग हीर, द टाटा पॉवर ग्राहक संपर्क केंद्र, धारावी रिसीव्हिंग केंद्र, शालीमार औद्योगिक केंद्राजवळ, माटुंगा (पूर्व), मुंबई - ४०० ०१९ | ६७१७ २३६३ |
| बोरीवली (पश्चिम) | श्री. धमेंद्र यादव , टाटा पॉवर ग्राहक संपर्क केंद्र, दुकान क्रमांक २, ३, एकता मुख्य इमारत, लिंक रस्ता, एस्के रिसॉर्टजवळ, बोरिवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९२ | २८९१ ३३३६ |
| अंधेरी (पूर्व) साकी | श्री. युसुफ नादाफ, टाटा पॉवर ग्राहक संपर्क केंद्र, युनिक क्रमांक ८-५५, कॉर्पोरेट ॲव्हेन्यू, साकी - विहार रस्ता, साकी विहार टेलीफोन एक्सचेंजच्या समोर, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०७२ | ६५१८१६७५ |

७. आयोगाने टाटा पॉवर-डीला जनतेकडून आपल्या याचिकेबाबत या सूचनेद्वारे सूचना/ आक्षेप मागवण्याच्या सूचना दिल्या आहेत. सूचना/आक्षेप इंग्रजी किंवा मराठी भाषेत सहा (१ अधिक ५) प्रतींमध्ये सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, सेंटर नंबर १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई- ४००००५, किंवा फॅक्स किंवा इमेलद्वारे (फॅक्स: २२१६३९७६, इमेल: mercindia@merc.gov.in द्वारे **बुधवार ६ डिसेंबर २०१७** रोजीपर्यंत सेवेच्या पुराव्यांसह श्री. भास्कर सरकार, प्रमुख- नियामक, टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, बॅकबे रिसिव्हिंग स्टेशन, १४८, लेफ्टनंट जनरल जे. भोसले मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई- ४०००२१, महाराष्ट्र, दूरध्वनी: (९१ २२) ६१७ २९०१, इमेल आयडी bhaskar.sarkar@tatapower.com येथे पाठवावेत. त्यावर पाठवणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि इमेल असल्यास देण्यात यावा. सूचना/ आक्षेप एखाद्या संस्थेद्वारे किंवा ग्राहकांच्या वर्गाद्वारे पाठवण्यात आले आहेत का हे सूचित करण्यात यावे. पाठवणाऱ्याची वैयक्तिक सुनावणी करण्याची इच्छा आहे का हेही सूचित करण्यात यावे जेणेकरून आयोगाकडून **मुख्य कार्यालय, तेरावा मजला मजला, सेंटर नंबर १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई- ४००००५ येथे गुरूवार, दिनांक १४ डिसेंबर २०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता** सार्वजनिक सुनावणीदरम्यान संधी दिली जाईल आणि त्यासाठी स्वतंत्र सूचना देण्यात येणार नाही.

८. टाटा पॉवर-डी **बुधवार दिनांक ६ डिसेंबर २०१७ पर्यंत प्राप्त झालेल्या प्रत्येक सूचना व आक्षेपांना तीन दिवसांच्या आत, परंतू सोमवार, ११ डिसेंबर २०१७ पूर्वी** उत्तरे पाठवेल. टाटा पॉवरने दिलेल्या उत्तरांवर जोड अर्ज एकतर **सार्वजनिक सुनावणीच्या वेळी किंवा दिनांक १८ डिसेंबर २०१७** पर्यंत सादर करू शकतील.

९. याचिकेचे सविस्तर कागदपत्र टाटा पॉवर-डीच्या www.tatapower.com या संकेतस्थळावर डाऊनलोड करून घेण्यायोग्य स्वरुपात (मोफत) उपलब्ध आहे.

स्वाक्षरी
नाव: भास्कर सरकार
पद: प्रमुख - नियमन
द टाटा पॉवर कंपनी लिमिटेड

ठिकाण : **मुंबई**
दिनांक: **मंगळवार, १४ नोव्हेंबर २०१७**